इंग्रजीत टंकलिखित नयनिर्णयचा मराठी भाषेत अनुवाद

२०२३ एससीसी ऑनलाईन एससी ३९६

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात

(अभय एस. ओक आणि राजेश बिंदल, न्यायमूर्ति यांच्या समक्ष)

जमीन आणि बांधकाम विभाग, द्वारा सचिव

आणि इतर ....अपीलकर्ता (कर्ते)

// विरुद्ध //

अत्रो देवी आणि इतर ....प्रतिवा दी(अनेक)

दिवाणी अपील क्र. २७४९/२०२३ (विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्र. ७५१०/२०२३ पासून उद्भवणारे (विशेष अनुमती याचिका (दिवाणी) डी. क्र. २३०६८/२०२१ पासून उद्भवणारे) ११ एप्रिल २०२३ रोजी निकाली काढले.

या प्रकरणात हजर असलेले अधिवक्ता

याचिकाकर्त्यांसाठी श्री. अतुल कुमार, अभिलेखावरील नियुक्त अधिवक्ता.

सु. श्री. स्वीटी सिंग, अधिवक्ता

सु. श्री. अर्चना कुमारी, अधिवक्ता.

श्री. राहुल पांडे,अधिवक्ता

श्री. राजीव रंजन, अधिवक्ता

प्रतिवादींसाठी श्री. राकेश कुमार- I, अभिलेखावरील नियुक्त अधिवक्ता.

सु. श्री. मणिका त्रिपाठी, अभिलेखावरील नियुक्त अधिवक्ता.

श्री. सुमित गुप्ता, अधिवक्ता.

श्री. प्रतीक मदनानी, अधिवक्ता.

राहुल श्याम भंडारी, अभिलेखावरील नियुक्त अधिवक्ता.

न्यायमूर्ति राजेश बिंदल यांच्या द्वारे न्यायलायचा न्यायनिर्णय पारित करण्यात आला.

- विलंब माफी मंजूर करण्यात आली.

२. परवानगी मंजूर करण्यात आली.

३. दिल्ली उच्च न्यायालयाने दिनांक २०.१२.२०१७ रोजी पारित केलेल्या आदेशाला अपीलकर्त्यांनी आव्हान दिले आहे. उचित नुकसान भरपाई मिळण्याकरिता आणि भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा कायदा २०१३ (थोडक्यात '२०१३ कायदा') च्या कलम २४ (२) च्या पार्श्वभूमीवर, वादग्रस्त जमिनीवर केलेले अधिग्रहण कालबाह्य झालेले आहे असे मत व्यक्त करत प्रतिवादींनी दाखल केलेल्या रीट याचिकेला उपरोक्त आदेशाद्वारे परवानगी देण्यात आली आहे.

४. अभिलेखावर उपलब्ध असलेल्या प्रकरणाच्या तथ्यांवरून हे स्पष्ट होते की भूसंपादन कायदा, १८९४ च्या कलम ४ अंतर्गत दिनांक २३/०६/१९८९ रोजी जारी केलेल्या अधिसूचनाद्वारे, नवी दिल्लीतील घोंडा, चौहान खादर या गावाच्या महसुली मालमत्तेत असलेल्या खसरा क्रमांक १/ETC ५७/१ आणि खसरा क्रमांक १/ETC ५८/१ मधील याचिकाकर्त्याच्या जमिनीचा मोठा भाग दिल्लीच्या नियोजित विकासासाठी संपादित करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. त्यानंतर दिनांक २०/०६/१९९० रोजी कलम ६ अंतर्गत अधिसूचना जारी करण्यात आली. दिनांक १९/०६/१९९२ रोजी या प्रकरणाचा निवडा घोषित करण्यात आला.

५. २०१३ च्या कायद्याच्या कलम २४ (२) चा वापर करून उच्च न्यायालयात एक रिट याचिका दाखल करण्यात आली होती, ज्यात असा दावा करण्यात आला होता की संबंधित संपादन कालबाह्य झाले आहे, कारण ताबा घेण्यात आलेला नाही किंवा त्यासाठी नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही.उच्च न्यायालयासमोर अपीलकर्त्याची भूमिका अशी होती की जमिनीचा ताबा दिनांक ०६/१२/२०१२ रोजी घेण्यात आला आणि तो त्याच वेळी डीडीए (DDA) कडे हस्तांतरित करण्यात आला. नोंदणीकृत जमीन मालक कधीही दावा करण्यासाठी पुढे आले नाहीत, त्यामुळे त्यांना नुकसान भरपाई देण्यात आली नाही.

६. पुणे महानगरपालिका - विरुद्ध - मिसिरीमल सोलंकी (२०१४) ३ एससीसी १८३ या दाव्यातील या न्यायालयाच्या निकालावर भर देत उच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले की जमीनमालकांना, म्हणजे येथे प्रतिवादींना नुकसान भरपाई दिली गेली नाही, म्हणून

संबंधित संपादन कालबाह्य झाले आहे.

७. अपीलकर्त्याच्या वतीने हजर असलेल्या विद्वान वकिलाने असा युक्तिवाद केला आहे कि या न्यायालयाच्या घटनापीठाने इंदूर विकास प्राधिकरण -विरुद्ध- मनोहरलाल, (२०२०) ८ एससीसी १२९ या मधे पारित केलेला न्यायनिर्णय ज्यामध्ये पुणे महानगरपालिका (उपरोल्लेखित) या प्रकरणात या न्यायालयाच्या न्यायनिर्णयची पायमल्ली करण्यात आली होती आणि त्यापार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाचा सदर आदेश रद्दबातल करण्यास पात्र आहे. जमिनीचा ताबा घेणे किंवा नुकसानभरपाई देणे या दोनपैकी कोणत्याही एका अटींचे पालन करणे हे संपादन टिकवून ठेवण्यासाठी पुरेसे आहे, असे मत घटनापीठाने व्यक्त केले. नोंदीत उपलब्ध असलेल्या निर्विवाद तथ्यांवरून हे स्पष्ट होते की सध्याच्या प्रकरणात, संपादन पूर्ण झाल्यानंतर वादातील जमिनीचा ताबा घेण्यात आला होता.

८. याव्यतिरिक्त, भारतमाला परियोजनाच्या पहिल्या टप्प्यात दिल्ली राज्यातील अक्षरधाम जंक्शन ते दिल्ली/उत्तर प्रदेश सीमेपर्यंत सुरू होणाऱ्या दिल्ली-सहारनपूर-देहरादून महामार्गाच्या बांधकामासाठी एनएचएआय (NHAI) या प्रकरणातील जमिनीची आवश्यकता आहे, ही एक महत्त्वाची बाब आमच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी कंत्राटदारांचीही नियुक्ती करण्यात आली आहे, परंतु सध्याचे अपील प्रलंबित असल्यामुळे सदर कामास विलंब होऊ शकतो. त्यामुळे प्रकरणातील जमीन हा राष्ट्रीय महत्त्व असलेल्या प्रकल्पाचा एक भाग आहे.

९. दुसरीकडे, प्रतिवादींच्या वकिलांनी युक्तिवाद असे म्हंटले आहे की उच्च न्यायालयाने निर्णयाच्या तारखेला अस्तित्वात असलेल्या कायद्याच्या आधारे निकाली काढलेल्या रिट याचिकेचा निकाल या न्यायालयाद्वारे त्यानंतर दिलेल्या निकालाच्या आधारे रद्दबातल केला जाऊ शकत नाही. उच्च न्यायालयाने असे म्हटले होते की, २०१३ च्या कायद्याच्या कलम २४ (२) च्या अन्वये या न्यायालयाने निर्वाचन केल्याप्रमाणे पुणे महानगरपालिका (उपरोल्लेखित) या प्रकरणात नुकसानभरपाई देण्यात आली नव्हती, त्यामुळे संपादनाची कार्यवाही संपुष्टात आली. जमिनीचा ताबा संबंधित प्राधिकरणाने आधीच

घेतला होता, ही वस्तुस्थिती उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशात लक्षात आली आहे.

१०. पक्षांची बाजू मांडण्याकरिता हजर होणाऱ्या विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकले आणि अभिलेखाचा अभ्यास करण्यात आला.

११. या न्यायालयाच्या घटनापीठाने इंदूर विकास प्राधिकरण (उपरोल्लेखित) या प्रकरणात असे मत व्यक्त केले होते की संपादित जमिनीचा ताबा घेणे किंवा जमीनमालकांना नुकसानभरपाई देणे या दोन्हीपैकी कोणत्याही एका अटींची पूर्तता करणे हे २०१३ च्या कायद्याच्या कलम २४ (२) नुसार संपादन कालबाह्य होण्यापासून बचाव करण्यासाठी पुरेसे ठरेल. घटनापीठापुढे ठेवलेल्या विविध प्रश्नाची उत्तरे सुद्धा देण्यात आली. संबंधित परिच्छेद-क्र. ३६२ आणि ३६६ चे उतारे खालील प्रमाणे आहेतः

"३६२. परिणामी, पुणे महानगरपालिका (उपरोल्लेखित) प्रकरणी दिलेल्या न्यायनिर्णयची याद्वारे पायमल्ली होऊन पुणे महानगरपालिकेने (उपरोल्लेखित) पालन केलेले इतर सर्व निर्णयही फेटाळण्यात आले आहेत.........

३६६. उपरोक्त चर्चा लक्षात घेता, आम्ही खालीलप्रमाणे प्रश्नांची उत्तरे देतोः

३६६.१. कलम २४ (१) (ए) च्या तरतुदींनुसार, २०१३ च्या कायद्याच्या प्रारंभाच्या तारखेनुसार, जर निवडा ०१/०१/२०१४ तारखेपयंत दिला गेला नाही, तर कार्यवाही संपुष्टात येत नाही. २०१३ च्या कायद्याच्या तरतुदींनुसार नुकसानभरपाई निश्चित करावी लागते.

३६६.२ जर न्यायालयाच्या अंतरिम आदेशाद्वारे समाविष्ट केलेला कालावधी वगळून पाच वर्षांच्या चौकटीच्या कालमर्यादेत हा निर्णय देण्यात आला असेल, तर २०१३ च्या कायद्याच्या कलम २४ (१) (बी) अंतर्गत १८९४ च्या कायद्यांतर्गत तरतूद केल्याप्रमाणे सदर कार्यवाही जणू ती रद्द करण्यात आलेली नाही असे ग्राह्य मानून सुरु राहील.

३६६.३. कलम २४ (४) मध्ये ताबा आणि नुकसानभरपाई दरम्यान वापरलेला शब्द

"or" (म्हणजे किंवा) या शब्दाचे "nor" (म्हणजे नाहि) किंवा "and" (म्हणजे आणि) असे वाचन करण्यात आले पाहिजे.२०१३ च्या कायद्याच्या कलम २४ (२) अंतर्गत, जेथे हा कायदा सुरू होण्यापूर्वी पाच वर्षे किंवा त्याहून अधिक काळापर्यंत अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे जमिनीचा ताबा घेण्यात आलेला नाही किंवा नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही तेथे भूमि संपादन कार्यवाही संपुष्टात आल्याचे मानले जाते. दुसऱ्या शब्दांत, जर ताबा घेतला गेला असेल, नुकसान भरपाई दिली गेली नसेल तर (कार्यवाही) संपुष्टात येत नाही. त्याचप्रमाणे, जर नुकसान भरपाई दिली गेली असेल, ताबा घेतला गेला नसेल तर (कार्यवाही) संपुष्टात येत नाही.

(भर देण्यात आला)

३६६.४. २०१३ च्या कायद्याच्या कलम २४ (२) च्या मुख्य भागात "paid" (म्हणजे भरणे) हा शब्दप्रयोग म्हणजे "न्यायालयात नुकसानभरपाई जमा करणे" हा अंतर्भूत नाही. जमा न करण्याच्या परिणामाची तरतूद कलम २४ (२) च्या तरतुदीत करण्यात आली आहे, जर बहुतांश भूखंडांच्या संदर्भात ती जमा केली गेली नसेल, तर १८९४ च्या कायद्याच्या कलम ४ अंतर्गत भूसंपादन अधिसूचनेच्या तारखेपर्यंतचे सर्व लाभार्थी (जमीनमालक) २०१३ च्या कायद्याच्या तरतुदींनुसार नुकसानभरपाई मिळण्यास पात्र असतील. भूसंपादन कायदा, १८९४ च्या कलम ३१ अंतर्गत काम पूर्ण न झाल्यास, उक्त कायद्याच्या कलम ३४ अंतर्गत व्याज दिले जाऊ शकते. नुकसानभरपाई (न्यायालयात) जमा न केल्याने भूमि संपादन कार्यवाही संपुष्टात येत नाही. पाच वर्षे किंवा त्याहून अधिक काळ पर्यंत मालकीच्या बाबतीत ठेवी जमा न झाल्यास, 'जमीनमालकांना' १८९४ च्या कलम ४ च्या प्रमाणे भूसंपादन अधिसूचनेच्या तारखेपर्यंत २०१३ च्या कायद्यांतर्गत नुकसान भरपाई द्यावी लागेल.

३६६.५. जर एखाद्या व्यक्तीला १८९४ च्या कायद्याच्या कलम ३१ (१) अंतर्गत तरतुदी केल्याप्रमाणे नुकसानभरपाई दिली गेली असेल, तर कलम २४ (२) अंतर्गत नुकसानभरपाई न भरल्यामुळे किंवा न्यायालयात नुकसानभरपाई जमा न केल्यामुळे संपादन संपुष्टात आले आहे असा दावा करणे हे कारण त्यांच्यासाठी पुरेसे

नाही. कलम ३१(१) अंतर्गत निविदा देऊन रक्कम भरण्याचे बंधन पूर्ण होते. ज्या जमीनमालकांनी नुकसान भरपाई स्वीकारण्यास नकार दिला होता किंवा ज्यांनी जास्त नुकसान भरपाईसाठी रेफेरन्स (reference) मागितला होता, ते २०१३ च्या कायद्याच्या कलम २४ (२) अंतर्गत संपादन प्रक्रिया संपुष्टात आल्याचा दावा करू शकत नाहीत.

३६६.६. २०१३ च्या कायद्याच्या कलम २४ (२) ची तरतूद कलम २४ (२) चा भाग म्हणून मानली जावी तर कलम २४ (१) (बी) चा भाग म्हणून नाही.

३६६.७. १८९४ च्या कायद्यांतर्गत आणि कलम २४ (२) अंतर्गत विचार केल्याप्रमाणे ताबा घेण्याची पद्धत हि चौकशी अहवाल/निवेदन तयार करणे आहे.एकदा १८९४ च्या कायद्याच्या कलम १६ अन्वये ताबा घेण्याचा निवडा मंजूर झाल्यानंतर २०१३ च्या कायद्याच्या कलम २४ (२) अन्वये राज्यातील जमीन विकली जात नाही, कारण एकदा ताबा घेतला की कलम २४ (२) अन्वये कोणतीही कार्यवाही संपुष्टात येत नाही.

३६६.८. २०१३ चा कायदा लागू होण्यापूर्वी पाच वर्षे किंवा त्याहून अधिक काळ भूमि संपादन आणि नुकसान भरपाई देण्यास अधिकारी अपयशी ठरल्यास, कलम २४ (२) च्या तरतुदी लागू होतात ज्या अन्वये कार्यवाही संपुष्टात आल्याचे मानले जाते.पाच वर्षांच्या गणनेमध्ये न्यायालयाने दिलेले अंतरिम आदेश कायम राहण्याचा कालावधी वगळला पाहिजे.

३६६.९. २०१३ च्या कायद्याचे कलम २४ (४) भूसंपादनाच्या अंतिम कार्यवाहीच्या कायदेशीरतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यासाठी नवीन कारणाला उगम देत नाही. कलम २४ हे २०१३ च्या कायद्याच्या अंमलबजावणीच्या तारखेला प्रलंबित असलेल्या कार्यवाहीला म्हणजे १-१-२०१४ ला लागू होते.हे शिळ्या आणि कालबद्ध दावे पुनरुज्जीवित करत नाही आणि निष्कर्ष काढलेल्या कार्यवाही पुन्हा उघडत नाही

किंवा जमीन मालकांना संपादन कारवाई पुन्हा उघडण्यासाठी ताब्यात घेण्याच्या पद्धतीच्या कायदेशीरतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याची परवानगी देत नाही किंवा भूसंपादन अवैध करण्यासाठी न्यायालयाऐवजी कोषागारात भरपाई जमा करण्याच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करू शकत नाही."

१२. इंदूर विकास प्राधिकरणाच्या दाव्यात (उपरोल्लेखित) माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने 'संपादनानंतर राज्याने जमिनीचा ताबा घेतला' याचा अर्थ काय आहे या मुद्द्याचा देखील विचार केला आहे. त्यात असे मत व्यक्त केले गेले आहे की, जमीन संपादन आणि निवाडा पारीत झाल्यानंतर, सर्व अडचणींपासून मुक्त होऊन जमीन राज्यात निहित होते. जमिनीचा ताबा राज्याकडे असतो. त्यानंतर ताबा राखून ठेवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला अतिक्रमण करणारा मानले पाहिजे. जेव्हा जमिनीच्या मोठ्या भागाचे संपादन केल्या जाते, तेव्हा राज्याने सदर जमीन ताब्यात ठेवण्यासाठी आणि सदर जमिनीचा वापर होईपर्यंत शेती सुरु करण्यासाठी काही व्यक्ती किंवा पोलिस दलाला ठेवले पाहिजे हे अपेक्षित नाही. एकदा संपादनाची प्रसंभाविक प्रक्रिया पूर्ण झाली की सरकारने त्याच ठिकाणी राहणे किंवा प्रत्यक्ष ताबा घेणे अपेक्षित नाही. संपादनाची प्रसंभाविक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आणि ताब्यात असलेल्या सर्व अडचणींपासून मुक्त जमीन राज्यात असल्यास, जमीन राखून ठेवणारी कोणतीही व्यक्ती किंवा कोणत्याही व्यक्तीने केलेला पुनर्प्रवेश हा राज्याच्या जमिनीवर अतिक्रमण करण्याव्यतिरिक्त दुसरा काही नाही. संबंधित २४४, २४५ आणि २५६ या परिच्छेदाचे खालील प्रमाणे उतारे आहेतः

"**२४४.** १८९४ च्या कायद्याच्या कलम १६ मध्ये अशी तरतूद करण्यात आली होती की, राज्य सरकार निवडा मंजूर केल्यानंतर जमिनीचा ताबा घेऊ शकते आणि त्यानंतर राज्य सरकारमधील सर्व अडचणींपासून मुक्त जमीन निहित करू शकते. कलम १७ (१) मधील निकडीच्या बाबतीतही अशाच तरतुदी करण्यात आल्या आहेत.

'ताबा' हा शब्द १८९४ च्या कायद्यात वापरला गेला आहे, तर २०१३ च्या कायद्याच्या कलम २४ (२) मध्ये "भौतिक ताबा" हा शब्द वापरला गेला आहे. असे सादर करण्यात आले आहे की जेव्हा प्रत्यक्षरित्या (जमिनीचा) भौतिक ताबा जमीन मालकाकडे राहतो तेव्हा ताबा घेण्यासाठी पंचनामा करणे पुरेसे नसते तर कलम २४

(२) मध्ये वास्तविकपणे भौतिक ताबा घेणे आवश्यक आहे आणि इतर कोणत्याही स्वरूपात ताबा घेणे आवश्यक नाही. जेव्हा राज्य सरकार जमीन संपादित करते आणि जेव्हा निवडा पारीत होतो, तेव्हा सदर सर्व अडचणींपासून मुक्त जमीन राज्य सरकार कडे असते. जमीन राज्याला हस्तांतरित करण्याची कृती म्हणजे त्याचा ताबा देणे आहे, त्यानंतर ताबा राखून ठेवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला अतिक्रमणकर्ता मानले पाहिजे आणि राज्यात सर्व अडचणींपासून मुक्त असलेली जमीन ताब्यात घेण्याचा त्याला कोणताही अधिकार नाही.

२४५. १८९४ च्या कायद्याखाली ताबा घेणे आणि कलम २४ (२) मध्ये वापरलेल्या 'प्रत्यक्ष ताबा' या शब्दप्रयोगात काही फरक आहे का हा प्रश्न उद्भवतो.खरे तर, १८९४ च्या कायद्यांतर्गत, ताब्यात घेऊन ज्याचा विचार करण्यात आला होता, त्याचा अर्थ केवळ जमिनीचा प्रत्यक्ष ताबा असा होता. २०१३ च्या कायद्यांतर्गत ताबा घेणे म्हणजे नेहमीच जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेणे होय. जेव्हा राज्य सरकार जमीन संपादित करते आणि ताब्यात घेण्याचे निवेदन तयार करते, तेव्हा ते जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेण्यासारखे असते. मालमत्तेच्या मोठ्या भागावर किंवा अन्यथा जी संपादित केलेली आहे, सरकारने ती ताब्यात ठेवण्यासाठी इतर कोणत्याही व्यक्तीला किंवा पोलिस दलाला ठेवणे आणि ती जमीन ज्या उद्देशासाठी संपादित केली आहे त्या उद्देशाने ती वापरली जाईपर्यंत त्यावर शेती सुरू करणे अपेक्षित नाही. एकदा ताबा घेतल्यानंतर त्यावर ताबा मिळवण्यासाठी चौकशीची कार्यवाही सुरू करून सरकारने तेथे वास्तव्यास सुरुवात करणे किंवा भौतिकरित्या ताबा घेण्यास सुरुवात करणे अपेक्षित नाही. त्यानंतर, जर जमिनीचा आणखी ताबा घेतला गेला किंवा जमिनीवर पुन्हा प्रवेश केला गेला किंवा कोणी खुल्या जमिनीवर लागवड सुरू केली किंवा आऊटहाऊस इत्यादींमध्ये राहायला सुरुवात केली, तर राज्याच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर अतिक्रमण करणारा मानला जाईल.अतिक्रमणकर्त्याचा ताबा नेहमीच खऱ्या मालकाच्या फायद्यासाठी असतो, जो त्या प्रकरणात राज्य सरकार असतो.

XXXX

२५६. अशा प्रकारे, हे स्पष्ट आहे की निहित करणे म्हणजे ताबा आहे आणि कायद्याने

१८९४ च्या कायद्याच्या कलम १६ आणि १७ अंतर्गत अशी तरतूद केली आहे की एकदा ताब्यात घेतले म्हणजे संपूर्ण निहितीकरण होते.हा एक अशून्यकारण अधिकार आहे आणि निहित करणे त्यानंतर ताब्यात असते. कलम १६ अंतर्गत निर्दिष्ट केलेले निहितत्व, कलम ४ अंतर्गत अधिसूचना, कलम ६ अंतर्गत घोषणा, कलम ९ अंतर्गत नोटीस, कलम ११ अंतर्गत पुरस्कार आणि नंतर ताबा यासारख्या विविध पायऱ्यांनंतर होते. सर्व अडचणींपासून पूर्णपणे मुक्त मालमत्ता निहित करण्याच्या वैधानिक तरतुदीची पूर्ण अंमलबजावणी करावी लागेल. राज्यातील केवळ ताब्याचे निहितच नाही तर इतर सर्व अडचणीही ताबडतोब काढून टाकल्या जातात. जमीनदाराचा हक्क संपुष्टात येतो आणि राज्य संपूर्ण मालक आणि मालमत्तेचा ताबेदार होतो. त्यानंतर मालमत्तेवर जमीनमालकाचे कोणतेही नियंत्रण नसते.त्याला मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्याला कोणतेही शत्रुत्व असू शकत नाही. जर राज्याने ताबा घेतल्यानंतर त्याने ताबा राखून ठेवला असेल किंवा त्यावर अन्यथा अतिक्रमण केले असेल, तर तो अतिक्रमण करणारा आहे आणि अशा प्रकारे अतिक्रमण करणाऱ्याचा ताबा त्याच्या फायद्यासाठी आणि मालकाच्या वतीने आहे."

(भर देण्यात आला आहे)

१३. आवश्यकतेची काळजी घेण्यासाठी आणि भविष्यातील गरजां राखून ठेवण्यासाठी नियोजित विकासासाठी जमिनीचा मोठा भाग संपादित केला जातो हे देखील लक्षात घेण्यासारखे आणि काळजी करण्यासारखे आहे.जमिनीचा असा भाग देखील रिक्त पडला असेल.या न्यायालयाने इंदूर विकास प्राधिकरण (उपरोल्लेखित) या दाव्यात असे निरीक्षण नोंदवले आहे की, संपादनाची प्रसंभाविक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर घेतलेल्या जमिनीच्या ताब्याला संरक्षण देण्यासाठी राज्य संस्थांनी पोलिस दल तैनात करणे अपेक्षित नाही.भारतमाला परियोजनाच्या पहिल्या टप्प्यात दिल्ली राज्यातील अक्षरधाम जंक्शनपासून दिल्ली/उत्तर प्रदेश सीमेपर्यंत सुरू होणाऱ्या दिल्ली-सहारनपूर देहरादून महामार्गाच्या बांधकामासाठी राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रकल्पासाठी ही जमीन रिक्त असली तरी आता आवश्यक आहे.

१४. ही अभिलेखावर नोंद असलेली निर्विवाद वस्तुस्थिती आहे की, उच्च न्यायालयाने दिलेल्या वादग्रस्त आदेशात नमूद केल्याप्रमाणे, जमिनीचा ताबा भूसंपादन जिल्हाधिकारी यांनी घेतला आणि दिल्ली विकास प्राधिकरणाकडे सुपूर्द करण्यात आला . ताबा घेण्याच्या कार्यवाहीचा दिनांक ०६/१२/२०१२ रोजीचा अहवाल देखील नोंदवला गेला आहे. म्हणून, सर्व अटींपैकी एक अट पूर्ण होत असल्याने, आपल्याला इतर कोणत्याही युक्तिवादाचे परीक्षण करण्याची आवश्यकता नाही.

१५. वरील वस्तुस्थिती आणि इंदूर विकास प्राधिकरण (उपरोल्लेखित) या प्रकरणात माननीय न्यायालयाच्या घटनापीठाने घालून दिलेला कायदा लक्षात घेता, आमच्या मते उच्च न्यायालयाने दिलेला आदेश कायदेशीररित्या कायम ठेवला जाऊ शकत नाही आणि त्यानुसार तो रद्द करण्यात येतो. तथापि, प्रतिवादींना त्यांच्या हक्कानुसार नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क असेल. भूसंपादन अधिकाऱ्यानेही योग्य मालकाला ती रक्कम देण्यासाठी पावले उचलली पाहिजेत.

१६. त्यानुसार याचिका निकाली काढण्यात येते.

अस्वीकरण

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल."